**कविता:- न जाणे कोणी; कसा हातचा; तो एक क्षण निसटला**

सूर लागला माझा तेंव्हा; लयीला नेमका हरपला
न जाणे कोणी; कसा हातचा; तो एक क्षण निसटला

नजरेत माझ्या दृष्टी येता; सृष्टी ओळखाया चुकला
न जाणे कोणी; कसा हातचा; तो हि एक क्षण निसटला

ताल मिळाला जेंव्हा आयुष्याचा; तोल नेमका हरपला
न जाणे कोणी; कसा हातचा; तो हि एक क्षण निसटला

शब्द सुचले जेंव्हा काही; नाद ऐसा हरपला
न जाणे कोणी; कसा हातचा; तो हि एक क्षण निसटला

शक्ती येता पायामध्ये; वाट नेमकी विसरला
न जाणे कोणी; कसा हातचा; तो हि एक क्षण निसटला

अपयश येता अंगाशी; नवी झेप घ्याया विसरला
न जाणे कोणी; कसा हातचा; तो हि एक क्षण निसटला

संधी येता दाराशी ती; नेमकी ओळखाया चुकला
न जाणे कोणी; कसा हातचा; तो हि एक क्षण निसटला

असेच किती तरी अमूल्य क्षण; पकडाया मी विसरला
आता मात्र हर एक चूक; सुधाराया न विसरला

असे काय झाले आयुष्य बदलले; फरक एवढा का पडला
उत्तर एकची मला माझा; गुरु खास जो भेटला.

अपयश अन् नाउमेदीचे; डोंगर झाले चीतपटाला
गुरु भेटता सुरुवात झाली; नव्या विजयी पर्वाला

© **सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी**
sachin.kulkarni78@gmail.com
www.saarthbodh.com